# छावणीत होणार आंतरराष्ट्रीय दर्जाच क्रीडासंकुल- खासदार चंद्रकांत खैरे

संभाजीनगर दि. १३- छावणीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉकी, फुटबॉलसह बहुउद्देशिय क्रिडा संकुलाचा प्रस्ताव छावणी परिषदेला सादर करण्याचे निर्देश शिवसेना उपनेतेत खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांना दिल्या. क्रीडसंकुलासाठी केंद्रातून निधी उपलब्ध करु व त्यासाठी पाठ पुरावा करु असे आश्वासन दिले.

छावणीचे अध्यक्ष तथा कमांडर ब्रिगेडीयर अनुराग विज यांच्या कार्यालयात छावणी परिषदेच्या समस्या व गोलवाडी नाका रस्ता रुंदिकरण, संदर्भात आज बैठक पार पडली. खासदार चंद्रकांत खैरे यांच्या अध्यक्षते खाली पार पडलेल्या या बैठकीत ब्रिगेडियर अनुराग विज, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकराचे प्रकल्प संचालक यु. जे. चामरगोरे, सार्वजनिक बांधकाम अधिक्षक अभियंता ए. बी. सुर्यवंशी, कार्यकारी अभियंता अरुंधती शर्मा, ॲडम कमांडर महाडीक, कर्नल रेड्डी, कर्नल शर्मा, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, छावणीचे प्रभारी सि. ई. ओ. विनीत लोटे, छावणी परिषदेचे अभियंता निलेश तनपूरे, उपाध्यक्ष रफत बेग, किशोर कच्छवाह, संजय गारोल, प्रशांत तारगे, शेख हनिफ, जिल्हा क्रिडा अधिकारी उर्मीला मारोळे, क्रिडा मार्गदर्शेक ए. झेड. शेख, उपअभियंता एम. टि. क्षिरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

क्रिडा संकुलाच्या यापुर्वीच्या प्रस्तावात पुर्ण तपशिल नव्हता, शिवाय खेळाडुंना प्रोत्साहन देत असतांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे सामने येथे व्हावे, अशा दर्जाचा प्रस्ताव सादर करा, त्याला छावणी परीषदेची तत्काळ मान्यता मिळवून देऊ, अशी ग्वाही ब्रिगेडीयर विज यांनी दिली.छावणीच्या विविध समस्या बैठकीत परिषदेच्या सदस्यांनी मांडल्या त्यावर सकारात्मक निर्णय घेऊ असे आश्वासन विज यांनी दिल्याने सदस्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. हॉकीच्या ॲस्ट्रोटर्फ मैदानाचा समावेश करण्याच्याही सुचना त्यांनी दिल्या. हा प्रस्ताव मोठ्या रकमेचा होत असल्याचे अधिकाऱ्यांनी बैठकीत निदर्शनास आणून देताच खासदार चंद्रकांत खैरे यांनी त्यासाठी केंद्रातून निधी उपलब्ध करु व त्यासाठी पाठ पुरावा करु असे आश्वासन दिले. यासंदर्भात क्रिडामंत्री विनोद तावडे, क्रिडासचिव नंद व क्रिडा संचालक राजाराम माने यांच्याही चर्चा करणार असल्याचेही खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले. क्रिडा संकुलात इनडोअर मल्टीपर्पज हॉल, स्पैश, जिम, यासोबत विविध क्रिडांगण असणार असून दहा ते बारा एकर जागा त्यासाठी लागणार आहे. ही जागा छावणी परिषद उपलब्ध करुन देणार असल्याचेही छावणी परिषदेच्या वतीने ब्रिगेडीयर विज यांनी सांगितले.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या रस्ता रुंदिकरणा संदर्भात गोलवाडी ते क्रांतीचौक रस्त्याची संपुर्ण पाहणी करण्यात आली. त्या संदर्भात नगरनाका येथे उड्डाणपुलाचा प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना ब्रिगेडीयर विज यांनी केल्या. वृक्षलागवड करतांना भविष्यातील रुंदिकरण लक्षत घेऊन रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड करण्याच्या सुचना शिवसेना उपनेतेत खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिल्या.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

**फोटो मेल केला आहे.**